International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# यशवंतराव गडाख यांचे मुळा सहकारी साखर कारखाना स्थापनेतील योगदान

**प्रा. विजया अशोक कोळेकर[1], प्रा. (डॉ). सुधीर भाऊसाहेब वाडेकर[2]**

*[1]राज्यशास्त्र विभाग, संशोधन केंद्र पेमराज सारडा कॉलेज, अहिल्यानगर*

*[2]राज्यशास्त्र विभाग, अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगर.*

*सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे, पुणे*

***Corresponding Author -*** ***प्रा. विजया अशोक कोळेकर***

**DOI - 10.5281/zenodo.18922868**

**प्रस्तावना:**

अहिल्यानगर जिल्ह्याच्या नेवासा तालुक्यातील सोनई गावी १२ मे १९४७ रोजी यशवंतराव कंकणराव गडाख यांचा जन्म झाला. त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला तर असे निदर्शनास येते की सर्व सामान्य शेतकरी कुटुंब, कुठलाही राजकीय वारसा नाही, गरीब परिस्थिती, शिक्षणाची आवड पण शिक्षण घेण्याची परिस्थिती नाही. प्रतिकूल परिस्थिती असताना ते डगमगले नाही.उच्च शिक्षण घेऊन गावी आल्यावर त्यांना राजकारणात येण्याची संधी मिळाली.नेवासा पंचायत समितीचे सभापती,जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष व अध्यक्ष, आमदार, खासदार अशी राजकीय पदे त्यांनी भूषविली. राजकारण, समाजकारण, सहकारक्षेत्र या वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांनी आपला वेगळा ठसा उमठविला आहे.

यशवंतराव गडाख यांनी अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यात सोनई येथे मुळा सहकारी साखर कारखान्याची स्थापना १४ जानेवारी १९७९ रोजी केली. कारखान्याचे संस्थापक म्हणून त्यांना ओळखले जाते. 'ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विकास' हाच कारखाना स्थापने मागचा उद्देश होता. विकासाची सुरुवात आपल्या गावापासून झाली तरच तो विकास आपल्याला पुढे घेऊन जाता येतो असे त्यांचे मत आहे. मुळा सहकारी साखर कारखाना त्यांनी सहकारी तत्त्वावर स्थापन केला. सहकारी साखर कारखान्याची पहिली निवडणूक होऊन यशवंतराव गडाख मुळा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष झाले. साखर कारखाना स्थापनेने ग्रामीण भागातील विकासला सुरुवात झाली.

मुळा सहकारी साखर कारखाना, सहकारी दुध संघ, मुळा सहकारी बँक, मुळा बाजार, डीस्टीलरी प्रकल्प उभारणीत यशवंतराव गडाख यांचे मोलाचे योगदान आहे.

**मुळा सहकारी साखर कारखाना:**

यशवंतराव गडाख हे १९६८-६९ मध्ये ते सभापती असताना एक दोन वर्षातच सोनई शिवाराच्या दक्षिणेच्या बाजूने खोदलेला मोठा पाट मुळा धरणाच्या पाण्याने भरून वाहू लागला. शेतकरी हा पिढ्यानपिढ्या खरिपाच्या हंगामावर, रबी हंगामातील ज्वारी, हरभरा अशा पिकावर अवलंबून होता. त्यामुळे पाण्याअभावी ऊसाचे पिक अत्यल्प घेतले जात होते. ऊसाच्या पिकाला जास्त पाणी लागते त्यामुळे पाण्याअभावी ऊसाचे पिक घेता येत नव्हते.

पाटाच्या पाण्यामुळे शेतकरी ऊसाच्या पीकाची लागवड मोठ्या प्रमाणात करू लागला होता. त्यामुळे सोनई परिसराचे चित्र पालटले. यशवंतराव गडाख यांना या बदलातून समोर येणाऱ्या समस्या, प्रश्न त्यांना दिसत होते. त्यामुळे त्यांनी या प्रश्नांचे, समस्यांचे समाधान शोधण्याचा प्रयत्न केला . यशवंतराव गडाखांनी असे काम करण्याचे ठरविले की ज्या कामाने त्यांची सर्व शक्ती पणाला लागणार

होती. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडण्याचा निर्णय त्यांनी घेतला. पाटाच्या पाण्यामुळे शेती पद्धती बदलली खरी पण निर्माण झालेली समस्या मोठी दाहक होती. याची जाणीव त्यांना होती.नव्यानेच ऊस उत्पादनाच्या प्रक्रियेत आलेल्या शेतकऱ्यांना या समस्येने ग्रासले होते.

पुणे कोल्हापूर भागातील एका सहकारी संस्थेला सहकार आयुक्त श्री कमरुद्दीन यांनी गुळ कम रम कारखान्याची परवानगी दिली होती. यशवंतराव गडाख जवळच्या कार्यकर्त्यांसह कमरुद्दीन यांना जाऊन भेटले आणि त्यांनी गुळ कम रम कारखान्याचे रजिस्ट्रेशन केले. यशवंतराव गडाख यांनी लोकांना सांगितले की, "कारखान्याचा पल्ला खूप मोठा आहे हे काम कधी होईल हे आपल्याला माहित नाही. आता जे मिळते ते घेऊन टाकू. प्रोजेक्ट तीस लाखाचे आहे त्यामुळे हे काम दिसते तितके सोपे सरळ नाही. शिवाय ते लोकांना ही पटले पाहिजे पण लोकांना साखर कारखाना हवा आहे". त्यांच्या या असा बोलण्याने कार्यकर्ते अंतर्मुख झाले होते. गुळ कम रम कारखान्याचे काम कसे चालते ते लोकांना दाखवले पाहिजे. जरी एखाद्या शिष्टमंडला घेऊन जाऊन दाखवायचे म्हणाले तरी असे युनिट जवळपास कुठेच नाही. साखर कारखान्यातून तयार होणाऱ्या साखरेचे विक्रीतंत्र,बाजारपेठ,तिचा भाव या सर्वांचे नेटवर्क विकसित झाले होते.पण गुळ कम रम कारखान्यातील उत्पादित मालाचे कुठलेही नेटवर्क नव्हते. पण एक होते की लोकांना त्यांच्या ऊसावर प्रक्रिया करणारा कारखाना त्यांच्या क्षेत्रात पाहिजे होता. कारखाना स्थापनेसाठी लोकांनी एकमुखाने पाठिंबा दिला आणि ३० लाख रुपये जमा करून प्रकरण तयार करून ते पुण्याच्या सहकार आयुक्ताकडे पाठवून गुळ कम रम कारखान्याचे रजिस्ट्रेशन मिळविले. असाच निर्णय पाथर्डीकरांनी घेतला होता.

बाबूजी आव्हाड त्यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष होते. या कामामुळे यशवंतराव गडाख, गुलाबराव, दादा पाटील आणि बाबूजी हे चार जन एकत्र फिरत होते. सर्व दृष्ट्या विचार करून असे लक्षात आले होते की या प्रकल्पातून निर्माण होणारा गुळ हीच मोठी समस्या होती. गुळाला स्थिर बाजारपेठ आणि बाजारभाव या दृष्टीने भवितव्य अंधारातच होते. पण सुरुवात तर झाली होती. शासनाकडे संपर्क साधला असता असे समजले की या विषयासंदर्भात माहिती हाजीअली कार्यालयात मिळेल. तिथे भेट दिल्यावर असे लक्षात आले की बाजारपेठेचा विषय निघताच हात झटकले जातात. त्यामुळे या प्रकल्पाच्या भवितव्याची चिंता वाटत होती प्रकल्पाचे पैसे लोकांचे होते. लोकांना आम्ही जबाबदार होतो. या असा चिंताग्रस्त परिस्थितीत बाबूजी आव्हाड हे आपल्या दिलखुलास आणि विनोदी स्वभावाने ताण कमी करण्याचा प्रयत्न करत होते.

दरम्यानच्या काळात साखर कारखान्याचा संपूर्ण प्रकल्प एक कोटीच्या आतील असेल तर त्या कारखान्याला परवानगीची गरज नाही असा केंद्र सरकारचा निर्णय झाला होता. अहमदनगर जिल्ह्यातून सोनई मुळा साखर कारखाना, कर्जतचा जगदंब, पाथर्डीचा वृद्धेश्वर, शेवगाव नेवासा सीमेवर भेंडा येथील ज्ञानेश्वर अशा चार कारखान्यासाठी प्रयत्न चालू होते. केंद्रात मंत्री असलेल्या अण्णासाहेब शिंदे यांनी या सर्वांची एकत्र बैठक घेतली. केंद्र सरकारने परवान्यासंबंधीचे धोरण शिथिल करताना काही अटी घातल्या होत्या. त्यात जमीन इमारती सहित सर्व प्रकल्पाचा खर्च एक कोटीच्या आतील आणि जुन्या सेकंड ह्यांड मशिन यांचा समावेश होता. या अटीच्या पुर्तते शिवाय रजिस्ट्रेशन होणे शक्य नव्हते.

यशवंतराव गडाख यांनी मारुतराव घुले यांच्या दोन तालुक्यांचा मिळून एक कारखाना हा प्रस्ताव तीनशे कार्यकर्ते आणि जुनी जाणकार मंडळी यांच्या बैठकी समोर मांडला. पण सोनईत स्वतंत्र कारखाना असावा अशीच लोकांची इच्छा या बैठकीत प्रगट झाली. त्यामुळे आता काय करावे हा यक्ष प्रश्न यशवंतराव गडाख यांच्या समोर होता. दुसऱ्या दिवशी जुनी जाणती माणसे यशवंतराव गडाख यांना भेटली. त्यांनी

आपला सोनईचा स्वतंत्र कारखाना असला पाहिजे असे यशवंतराव गडाखांना स्पष्ट सांगितले.

एक कोटीच्या आतील प्रकल्पा संबंधीचा केंद्र सरकारचा जी. आर. एका सहकारी कारखान्याकडे होता तो आणण्यासाठी यशवंतराव गडाख गेले असताना तेथील कार्यकारी संचालकांनी पाच- पंचवीस लोकांसमोर अपमानास्पद वागणूक दिली. जी.आर काही दिला नाही. या घटनेने यशवंतराव गडाख खूपच अस्वस्थ झाले होते. अपमानाने खचून न जाता यशवंतराव गडाख यांनी एक कोटीच्या आतील प्रस्ताव तयार करून नोंदणी प्रक्रियेला सुरुवात करून कुठल्या तरी जुन्या साखर कारखान्याची यंत्र सामग्री खरेदी करण्याचा निर्णय घेतला.या सर्व प्रक्रीयेसाठी सहकार क्षेत्रातील अनुभवी व्यक्ती राहुरी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष आणि राज्य साखर संघांचे अध्यक्ष बाबुराव तनपुरे यांची भेट घ्याची ठरबून ते भेट घ्यायला गेले.

दादा आम्हाला मदत करा, कारखाना उभारून द्या असे यशवंतराव गडाख त्यांना म्हणाले मदत करण्याचे बाबुराव तनपुरे यांनी मान्य करून आंध्रप्रदेश मधील एका कारखान्यांची यंत्र सामग्री विक्रीला होती त्याचा पत्ता त्यांनी दिला. आणि इंजिनियर जोशी मदतीला दिले. आंध्रप्रदेशातील तनुक या गावी रामय्या नावाच्या उद्योगपतीची साखर कारखान्याची यंत्र सामग्री विकायला होती. यंत्र सामग्रीच्या करारासाठी परिसरातील वीस -पंचवीस लोकांना सोबत नेले होते. यशवंतराव गडाखांच्या विरोधात असलेले वसंतराव हांडे यांना आग्रहपूर्वक बरोबर घेतले होते. साखर कारखान्यांच्या एकूण व्यवहारावर देखरेख करण्यासाठी राज्यस्तरीय समितीवर सचिव म्हणून आय.ए.एस.अधिकारी आणि अध्यक्ष रत्नाप्पा कुंभार हे होते. रत्नाप्पा यांच्याकडे सहकारातला, संस्थांच्या उभारणीतील, समाजकारणाचा दांडगा अनुभव होता. त्यांनी सर्वांना बोलायचे तेवढे बोलून दिले आणि मग त्यांच्याकडे रोखून बघत बोलेले की केवळ कागदी घोडे नाचून संस्था उभारली जात नाही. हा सहकारी कारखाना आहे.सर्वसामान्यजनतेच्या पैशातून याची उभारणी होत आहे. त्यामुळे या कामाचे नेतृत्व करणारे या लोकांना बांधील आहे .अशा कामात माणसांचा विश्वास संपादन करावा लागतो. व्यवहार हा खाजगी कारखान्या बरोबर आहे. अशा वेळी माणस बरोबर घेऊन जावी लागतात.यशवंतराव गडाख यांनी वीस -पंचवीस माणसे नेली ती काही विमानाने नेली नव्हती, मजेसाठी, चैन करायला ते घेऊन गेले नव्हते. या सर्वांना ते रेल्वेच्या तिसऱ्या डब्ब्याने घेऊन गेले होते. अनेक समस्या यशवंतराव गडाख यांच्या समोर टप्या टप्यावर येत होत्या.पण यशवंतराव गडाख त्यांच्या निर्णया पासून थोडे ही डगमगित झाले नाहीत. समस्यांना सामोरे जात त्यांनी सहकारी साखर कारखाना उभारण्याचे कार्य चालूच ठेवले होते.

एकीकडे सरकारी यंत्रणा, अव्यवहारी नियम तर दुसरीकडे उतावीळ, उधळ, असंयमी कार्यकर्त्यांचा गोंधळ यात यशवंतराव गडाख यांची प्रचंड ओढताण होत होती. या दरम्यान बाबुराव तनपुरे म्हणाले की, जर लायसन्स मिळत नसेल आणि कारखाना स्थापन होणार नसेल तर सोनई परिसरातील गावांना राहुरी कारखान्यात सामावून घेऊन कारखान्याचा सहावा गट तयार करतो. अशी इच्छा त्यांनी बोलून दाखवली. लोक ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते त्यांना सोनई साठी स्वतंत्र कारखानाच पाहिजे होता.

वसंतदादा पाटील आणि यशवंतराव गडाख हे रामय्या तेलगु साखर कारखानदाराची मुंबईत भेट घेऊन करार रद्द केला आणि तीन लाख रुपये रामय्या कारखानदाराने परत दिले.

वसंतदादा पाटील हे यशवंतराव गडाख यांना वडिलधारे होते. कारखान्याचे काही अडले नडले की यशवंतराव गडाख त्यांच्याकडे जात होते. यशवंतराव गडाख कारखान्याच्या मंजुरी साठी वसंतदादा त्यांच्याकडे गेले. दादा यशवंतराव गडाखांना सहकारमंत्री यशवंतराव मोहिते यांच्याकडे घेऊन गेले. त्यांनी मुळा कारखान्याची फाईल मागून घेतली. ते आम्हाला मुख्यमंत्र्यांकडे घेऊन गेले.

वसंतदादा पाटील बोले की, "नाईक साहेब हा कारखाना व्हावा.पाणी,ऊस,जमीन अशी सर्व परिस्थितीत अनुकूल आहे. यशवंतराव गडाख हा तरुण पोरगा गेली काही वर्ष धावपळ करत आहे. त्याला मदत करा". सारे ऐकून नाईक साहेब बोले की, "पश्चिम महाराष्ट्रात किती कारखाने काढता विदर्भ मराठवाड्याचा काही विचार करणार आहात की नाही". दादा म्हणाले, पश्चिम आणि मध्य आणि पूर्व असे भाग कशाला? आमच्या डोक्यात असे काहीही नाही. तिकडे ही कारखाने होऊ द्या. तेथील कार्यकर्त्यांनी, तरुणांनी जरा असा उत्साह दाखवावा.प्रस्ताव आणावेत आमची काही हरकत नाही. आम्ही त्यांना मदत करू. आता या पोराचे काम बघा.

यशवंतराव गडाख यांनी जनमत तयार केले.गावोगावी हिंडले तीस लाख रुपये जमा केले. गुळ कम रम कारखाना नंतर सहकारी साखर कारखाना अशी सर्व सारी धडपड स्वतःच्या हिंमतीवर केली. आंध्रप्रदेश मध्ये जाऊन जुन्या मशिनरीच्या खरेदीचा करार केला. या पोराला आम्ही बोटाला धरून चालवायला शिकवले नाही तो स्वतःच धडपडत शिकला आणि इथ आला.

**स्थापना : मुळा सहकारी साखर कारखाना:**

१४ जानेवारी १९७९ रोजी मुळा सहकारी साखर कारखाना स्थापन करण्यात आला. कारखान्याच्या प्रस्तावातील कार्यक्षेत्रात बारा गावांचा समावेश होता. शनिशिंगणापूर येथे पहिली बैठक झाली. पहिल्या शेअरची पावती कोणाच्या नावानी फाडायची यावर चर्चा सुरु होती. पहिला शेअर तेथे उपस्थित असलेल्या ज्येष्ठ गंगाभाऊ दरंदले यांच्या पत्नीच्या नावाने फाडण्याचा निर्णय झाला. मुळा साखर कारखान्याची पहिल्या शेअरची नोंदणी सत्यभामाबाई दरंदले यांच्या नावाने झाली.

**गाळप हंगाम क्षमता:**

सुरुवातीला दैनदिन गाळप हंगाम हा १२५० टन होता.आता त्याची क्षमता ७००० ट ना पर्यंत वाढ झाली आहे. त्यामुळे हंगामात १५ ते १६ लाख टन गाळप होणे शक्य झाले आहे. कारखाना स्थापने पासून ४७ हंगाम पूर्ण होऊन आता ४८वा हंगाम चालू आहे. ८७ गावातून १७ हजारावर सभासद आहेत. दरवर्षी २५ ते ३० हजार शेतकरी कारखान्याला ऊस पुरवतात.

**ऊसाची उपलब्धता:**

1) एकूण पार पडलेले सिझन(२०१४-१५ सह) - ४२ सिझन
2) अतिरिक्त ऊस बाहेर दिलेले सिझन - ३३
3) बाहेर दिलेला एकूण ऊस - २४.७९ लाख टन
4) बाहेरून ऊस आणलेले सिझन - ३१ सिझन
5) कार्य क्षेत्रा बाहेरील एकूण गळीत केलेला ऊस – १०.६४ लाख टन
6) साखर उत्पादन हे २३३.०० लाख क्विनटल होत.

**गाळप क्षमता:**

सुरुवातीची गाळप क्षमता – १२५० मे.टन प्रतिदिन, विस्तारवाढ (१९८६ ते१९८७) - २००० मे.टन प्रतिदिन, विस्तारवाढ (१९९४ ते १९९५) - २५०० मे.टन प्रतिदिन, विस्तारवाढ (२००२ ते २००३) – ३५०० मे.टन प्रतिदिन, विस्तारवाढ (२०१४ ते २०१५) – ५००० मे.टन प्रतिदिन

**सहउत्पादने:**

बायप्रोडक्ट प्रकल्प – ३० मे.वेटवीज निर्मिती क्षमतेच्या वीज प्रकल्पाची दोन टप्प्यात निर्मिती केली जाते. पहिला टप्पा – १६ मे.व्यट, दुसरा टप्पा – १४ मे.व्यट तसेच दररोज ६० हजार लिटर अल्कोहल/ इथेनॉल निर्मिती क्षमतेचा विस्तारित डीस्टीलरी प्रकल्प व इथेनॉल निर्मिती केली जाते.

**विशेषबाब:**

मुळा सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रातील कार्यान्वित साखर कारखान्यापैकी एक आहे.

**निष्कर्ष:**

यशवंतराव गडाख जिल्हा परिषद निवडणुकीत निवडून आल्यानंतर त्यांनी अनेक विकासाची कामे केली. सोनई गावातील लोकांचे अनेक प्रश्न त्यांनी सोडविले. तसेच सोनई भागातील समस्यांचा त्यांचा चांगला अभ्यास होता. १९७२ चा दुष्काळ जनतेने अनुभवला होता. गरीब, निरक्षर जनता, रूढी, परंपरा, जातीची उतरंड असे अनेक प्रश्न फक्त गावातच नाही तर देशात पण बघायला मिळत होते. अशा परिस्थितीत विकासाचे पाऊल उचलणे म्हणजे एक क्रांतिकारक निर्णय घेणे असेच होते. अशा परिस्थितीत सोनई गावात सहकारी साखर कारखाना स्थापन करण्याचा क्रांतिकारक निर्णय यशवंतराव गडाखांनी घेतला. या निर्णयाने सोनई गावाचे चित्र पालटले. सोनई गावाचे नाव देशात झाले आहे.

**संदर्भ सूची:**


1) गडाख यशवंतराव, “ अंतर्वेध ” ऋतुरंग प्रकाशन, मुंबई २०१२.
2) गडाख यशवंतराव, “ माझे संचित ” ऋतुरंग प्रकाशन, मुंबई २०१७
3) गडाख यशवंतराव, “ सहवास ” ऋतुरंग प्रकाशन, मुंबई २०१७ .
4) गडाख यशवंतराव, “ कवडसे ” ऋतुरंग प्रकाशन, मुंबई २०१७ .
5) गडाख यशवंतराव, “ अर्धविराम”, ऋतुरंग प्रकाशन, मुंबई २००३, २०१८ .
6) गडाख यशवंतराव, “ मनातला पाऊस” ऋतुरंग प्रकाशन, मुंबई २०२ २.
7) https://mahasugar.in
8) https://www.esakal.Com